मुंबई विद्यापीठ
राष्ट्रीय सेवा योजना विभाग

Azadi Ka Amrit Mahotsav

वेबसाईट :-www.nssmu.org
राष्ट्रीय सेवा योजना विभाग,
विद्यापीठ विद्यार्थी भवन,
२ रा मजला, 'बी' रोड,
**चर्चगेट, मुंबई - ४०० ०२०.**


पत्र.क्र.रासेयो/ईसीडी/२०२४-२५/
दिनांक : १६.०८.२०२४
सौर शुक्रवार २५ श्रावण १९४६

**प्रति,**
**मा. प्राचार्य,**
राष्ट्रीय सेवा योजना अंतर्गत मुंबई विद्यापीठ अधिनस्त सर्व महाविद्यालये.

**विषय : नशामुक्त भारत अभियानांतर्गत विविध उपक्रम आजोजित करणेबाबत....**

**संदर्भ** : समाज कल्याण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्र.स.क.आ./न.भा.अ. /२०२४-२५/का.१७/१४७, दिनांक ०९.०८.२०२४ रोजीचे पत्र.

महोदय/महोदया,

मादक पदार्थांच्या गैरवापरास प्रतिबंध करण्याकरीता व भारत देशाला अंमली पदार्थमुक्त बनविण्याच्या दृष्टीकोनातून केंद्र शासनाच्या सामाजिक न्याय व अधिकारिता मंत्रालयामार्फत **'नशामुक्त भारत अभियान'** राबविण्यात येत आहे.

अभियानाची या वर्षाची संकल्पना **''विकसित भारत का मंत्र, भारत हो नशेसे स्वतंत्र'** अशी असून सदर अभियान देशभर सर्व महाविद्यालयामध्ये राबविण्यासाठी सामाजिक न्याय व अधिकारीत, मंत्रालय भारत, सरकार यांचे तर्फे निर्देश देण्यात आले आहेत.

त्या नुसार सर्व महाविद्यालयीन राष्ट्रीय सेवा योजना एककांद्वारे आपआपल्या महाविद्यालय, दत्तक वस्ती/गांव येथे विद्यार्थी, युवक, युवती, महिला, खेळाडू, अधिकारी, कर्मचारी यांचा सहभाग घेऊन अंमली पदार्थांच्या जनजागृती बाबत परिसंवाद, व्याख्यानमाला, कार्यशाळा, मानवी साखळी, रॅली, नाटक पथनाटये, मॅरेथॉन, पदयात्रा इत्यादी विविध उपक्रम राबविण्यात यावेत.

सदर' उपक्रम राष्ट्रीय सेवा योजना अंतर्गत नियमित व विशेष शिबिर दरम्यान आयोजित करण्यात यावेत.

आपला

सुशील शिंदे
विशेष कार्य अधिकारी, (रा.से.यो.)